| MHRT050009352010 | **नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०१०**<br><br>**हरीभाई अर्जुन पटेल व.२**<br>**विरुध्द**<br>**विनय भिमराव सुतार व.२** |
|---|---|

## निशाणी १ खालील आदेश

प्रस्तुतचा दावा वादी यांनी दावा मिळकत रस्त्यातून जाण्या–येण्यास हरकत अडथळा होईल असे प्रतिवादी यांनी कोणतेही बांधकाम करु नये असा निरंतर ताकीदीकरीता व प्रतिवादी यांनी विनापरवाना व बेकायदा केलेले बांधकाम काढून टाकण्याचा आदेश होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा पंधरा वर्षे जुना असून वादी यांनी निशाणी २० वरील आदेशानुसार कोर्ट कमिशनर अहवालाबाबत पुर्तता करणेकरीता मागील बऱ्याच तारखांपासून प्रलंबित आहे. वादी हे सतत अनुपस्थित आहेत असे रोजनाम्यावरुन दिसून येते. वादी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी तजवीज करणेकरीता मुदतीचा अर्ज (निशाणी २६) सादर केला. सदरचा अर्ज हा शेवटच्या संधीवर मंजूर करण्यात आला. त्यानंतर पुन्हा वादी गैरहजर राहिले व त्यांनी पुढील तजवीज करण्याची तसदी घेतली नाही. सदर प्रकरणात कोर्ट कमिशनर यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त होणेसाठी वादी यांनी निशाणी २० वरील आदेशानुसार पुर्तता केली आहे किंवा नाही याबाबत अभिलेखावर दिसून येत नाही. वादीने देखील त्याबाबत न्यायालयात कळविले नाही. सदर प्रकरण खारीज करण्याच्या आदेशासाठी ठेवलेले असताना देखील वादी न्यायालयात हजर राहिला नाही. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादीला सदर दावा चालविणेमध्ये स्वारस्य नाही. आजही वादी यांचा पुकारा केला असता गैरहजर. तसेच त्यांनी कोणताही अर्ज दिला नाही. अशा परिस्थितीत दावा पुढे प्रलंबित ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

**१.** सदरचा दावा हा वादीच्या अनुपस्थितीमुळे व तजवीज अभावी खारीज करण्यात येतो.

MHASKE DADA GOPINATH
Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.07.23 17:09:14 +0530

**(डी. जी. म्हस्के)**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खेड

**दिनांक: २३.०७.२०२६** ता. खेड, जि. रत्नागिरी.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.64/2010 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 23.07.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 23.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 23.07.2026 |